مطوية الله اكبر ( اللغة المراتية)

مراجعه:دكتور سفيان قاضی مدنی

الكاتب: محمد فاروق ہرزک

# अल्लाहू अकबर

## " तो आत्मनिर्भर (वस्वयंपूर्ण ) आहे"


लेखक

मोहम्मद फारुक हुर्ज़ूक

हरकोल माणगाव

संदर्भ आणि सुधारणा

डॉ. सुफ्यान काझी



सन. २०२५


" अल्लाहू अकबर या शब्दाचा अर्थ अल्लाहच सर्वात श्रेष्ठ व महान आहे. आणि तो आत्मनिर्भर (व स्वयंपूर्ण ) आहे.अल्लाहने कुरआण मध्ये असे शिक्षण दिले आहे की , [ "आकाशत आणि पृथ्वीवर जे काही वस्तू आहेत ते सर्व अल्लाहच्या पवित्रतेचे वर्णन करीत आहेत. आणि तो मोठा वर्चस्वशाली व अस्सल बुध्दिवान आहे ."]
(कुरआण - ५७ : १ )

आकाश आणि पृथ्वीचे राज्य केवळ अल्लाहचेच आहेत अल्लाहने आकाश व पृथ्वी आणि या दरम्यान जे काही वस्तू आहेत ते सर्व सहा दिवसात निर्माण केले आहे , त्यानेच एका
मानवाला मातीपासून निर्माण केले , मग त्या
माणसाच्या डाव्या किडणी पासून स्त्रीला ( हव्वाला ) निर्माण केले , मग दुसऱ्या लोकांना जन्म देण्याचा मार्ग वीर्या पासून बनविले तोच अल्लाह आहे ज्याने जीवन प्रदान केले आणि मृत्यू देखील तोच देतो आणि तो प्रत्येक गोष्टीचे सामर्थ्य राखतो. [ "तोच पहिल्या पासून आहे आणि नेहमीसाठी राहील.तोच दृश्य आणि अदृश्य आहे आणि तो प्रत्येक वस्तूला चांगल्या प्रकारे जाणणारा आहे.(कुरआण-५७ : ३)

[ " त्यानेच निरक्षर (उम्मी ) लोकांमधून त्यांच्यातून एक संदेशवाहक पाठविला जो त्यांना त्याची महावाक्ये ( ईशवाणी )वाचून ऐकवितो आणि त्यांचे शुध्दीकरण (पवित्र) करतो आणि त्या लोकांना ग्रंथ आणि शाहणपणाचे ज्ञान शिकवितो. नि : संशय ते या पूर्वी स्पष्टरित्या वाट चुकलेले होते.(कुरआण - ६२ : २ )

कुरआण द्वारे वरील सर्व गोष्टींवर मुसलमानाची श्रध्दा आहे की, अल्लाह सर्वात श्रेष्ठ व महान आणि सर्व वस्तू पासून अलिप्त आहे.कोणतीही वस्तू त्याच्य पेक्षा मोठी किंवा श्रेष्ठ नाही. [ "..... त्याची (अल्लाहची )तुलना कशाशीच होऊ शकत नाही.तो सर्व काही ऐकणारा व पाहणारा आहे. " ](कुरआण - ४२:११) अल्लाहसमोर सर्व वस्तू लहान आहेत. म्हणून आम्ही सर्व मुसलमान एका अल्लहची श्रेष्ठता, बुजर्गी आणि त्याचे मोठेपण होण्याचे आवाहन करीत असतो. जसे की, कुरआण मध्ये अल्लहने स्पष्ट शब्दात रेखाटले आहे. [ " आणि सांगा सर्व प्रकारची स्तुती - प्रशंसा अल्लाहसाठीच आहे , त्याला ना कोणी संतती आहे आणि ना त्याच्या राज्यात दुसऱ्या कोणाला भागीदार ठेवतो,तो कोणत्याही प्रकारे अशक्त नसल्यामुळे त्याचा कोणीही साहाय्यकर्ता नाही.आणि तुम्ही त्याची विविध प्रकारे स्तुतीचे गुणगान (गौरव) करीत राह. " ](कुरआण -१७ :१११ )

[ " हे वस्त्र (अंगावर चादर) पांघरूण घेणारे ! उठ आणि लोकांना सावध कर आणि आपल्या
पालनकर्त्याचा गौरव कर ." ](कुरआण - ७४ : १ ,२ , ३ )

कुरआण द्वारे स्पष्ट झाले की, इस्लाम धर्मात अल्लाहू अकबर याच एक कलिमाचा खुलासा आणि संपूर्ण उपासनेची आत्मा आहे .जसा की अजान ( लोकांना नमाजा करीता बोलवणे )च्या वेळी अल्लाहू

अकबर म्हणतात आणि जेव्हा आम्ही नमाज सुरू करत्याँ वेळी अल्लाहू अकबर म्हणता , तसेच रुकू (शरीर झुकवणे ) , शरीराला पुन्हा उठवते वेळी, आणि सजदा (नतमस्तक) करते वेळी आणि सजदातून उठते वेळी अल्लाहू अकबर म्हटले जाते .

रमजान विषयी अल्लाहने कुरआण मध्ये असे सांगितले आहे.[ "........ तुम्ही ( रमजानचे उपवासाच्या दिवसांची ) संख्या पूर्ण करा आणि अल्लाहने दिलेल्या मार्गदर्शनावर त्याच्या श्रेष्ठत्वाचे वर्णन (गौरव) करा आणि त्याचे आभार माना ."](कुरआण -२:१८५ ) म्हणजे ईदच्या वेळी मोठ्या आवाजाने अल्लाहू अकबर ची तसबी करा

बकरा ईद विषयी अल्लाहने कुरआण मध्ये असे सांगितले आहे.["अल्लाहला कुर्बानीचे मांस पोहचत नाही.ना त्याचे रक्त तर अल्लाह प्रति तुमच्या मनातले ईशभय (चांगले निती) आहे ते पोहचते. आशा प्रकारे अल्लाहने ज्या पशूना तुमच्या ताब्यात दिले आहे तुम्ही त्याच्या मार्गदर्शना च्या आभारात त्याच्या महानतेचे वर्णन करा आणि चांगले कृत्य करणाऱ्यांना शुभवार्ता देऊन टाका. "](कुरआण -२२:३७ )

कुरआण द्वारे सिध्द झालं की गौरव (स्तुतीगान) केवळ अल्लाहची केली पाहिजे म्हणून मुसलमान लोक कुरआणवर विश्वास ठेऊन संदेष्टा मुहम्मद (स.अ.व.) चे आज्ञापालन करीत. ईदच्या नमाजावेळी आणि पशुचा दान देतेवेळी वेळी ज्या पशुंना कापण्याचा आदेश दिला आहे.त्या वेळी हा कलिमा " अल्लाहू अकबर " खाली लिहल्या प्रमाणे म्हणतात.

| अरबी तकबीर | मराठी अर्थ |
|---|---|
| अल्लाहू अकबर अल्लाहू अकबर | अल्लाहच सर्वात महान आहे (२ वेळा ) |
| ला इलाह ईल्लल्लाहू अल्लाहू अकबर | अल्लाच्या शिवाय सत्य पुजनीय दुसरा कोणीही नाही |
| अल्लाहू अकबर वल्लीलाहील हम्द | अल्लाहच श्रेष्ठ आणि पवित्रता व प्रशंसा केवळ अल्लाहसाठी आहे. |

जे लोक अल्लाहच्या विरोधात वाईट नीती बाळगून विद्रोही सैतानाचे कार्य करतात त्यांच्या बाबतीत अल्लहने कुरआण मध्ये असे सांगितले आहे .[" लोकांनो ! जमिनीवर जे काही वैध आणि आरोग्यदायी आहे ,ते खा. आणि सैतानाचा मार्ग अनुसरु नका.नि:संदेह तो तुमचा उघड़ -उघड शत्रू आहे. तो तुम्हाला दृष्ट (वाईट) आणि अश्लील गोष्टींचीच प्रेरणा देतो. अल्लाह विषयी अशा गोष्टी सांगण्याची प्रेरणा देतो, ज्याचे तुम्हाला मुळीच ज्ञान नाही."](कुरआण - २ :१६८ , १६९ )

कुरआणच्या दुसऱ्या ठिकाणी असे सांगितले आहे ,[" काय जे लोक दुष्कर्म करीत आहेत त्यांनी असे समजून घेतले आहे.की आमच्या (अल्लाहच्या) ताब्यातून सुटका करून घेऊ शकतील ? कसा वाईट विचार हे लोक करीत आहेत ज्याला अल्लाहच्या भेटीची अपेक्षा असेल तर अल्लहची निर्धारित केलेली वेळ निश्चितच येणार आहे तो सर्व काही ऐकणारा , सर्व काही जाणणारा आहे."](कुरआण - २९ : ४ , ५ ) प्रेषित मुहम्मद (स.अ.व ) यांनी सांगितले [' माझा आदेश लोकांपर्यंत पोहचवावा जर का एक व्याख्या (श्लोक) का असो ना '](सही बुखारी - ३४६१)

बंधुनो ! कुरआण आणि संदेशवाहक मुहम्मद (स.अ.व. )च्या कथनाद्वरे हा एक महत्वपूर्ण उपदेश आहे की , अल्लाहू अकबर हा शब्द किंवा अल्लाह व कुरआण आणि मुहम्मद (स.अ.व.) च्या विषयी कोणतेही अपशब्द वापरुन आणि यांचा विरोध करुन विद्रोही सैतानाचे मित्र बनून स्वतःला तोट्यात (नुकसानात) टाकू नये . ही कळकळीची नम्र विनंती . नि:संशय तुमचा पालनकर्ता अल्लाह फार कनवाळू व दयाळू आणि क्षमाशील आहे. म्हणून या पत्रिकेद्वरे लोकांना समजावून दिले जात आहे की त्या अल्लाह सारखा दुसरा कोणीही उपासने पात्र नाही, यासत्व तुम्ही अल्लाहचे भय राखा .